ठाणे पोलीस आयुक्तालय

महाराष्ट्र शासन
(गृह विभाग)
पोलीस उप आयुक्त, परिमंडळ ३ यांचे कार्यालय
कल्याण प. -४२१३०१

Email ID: cp.thane.dcpzone3@mahapolice.gov.in

दूरध्वनी क्र:०२५१/२३१३४१३

प्रेस नोट दि. २५/०८/२०२५

घरफोडी चोरीच्या गुन्हयातील आरोपीतांना अटक करून चोरीचा मुद्देमाल हस्तगत

दि.१६/०४/२०२५ रोजी दुपारी १२.१५ वा. ते ०४.३० वा.च्या दरम्यान अज्ञात आरोपीने वालधुनी, कल्याण पुर्व, येथील एका घराच्या मुख्य प्रवेशव्दाराची कडी कोयंडा तोडुन बेडरूम व किचन मधील लोखंडी कपाटाचा लॉक तोडुन सोने, चांदीचे दागिणे व इतर वस्तु असा एकुण १२,६९,०००/—रू. किमतीचा माल घरफोडी करून चोरी करून नेला होता.त्याबाबत महात्मा फुले चौक पोलीस ठाणे येथे गु.रजि.नं. ४१५/२०२५ भारतीय न्याय संहीता २०२३ चे कलम ३३१(३), ३०५(ए) अन्वये गुन्हा दाखल झालेला होता.

सदर गुन्हयातील अज्ञात आरोपीतापर्यत पोहचण्याचे कोणतेही धागेदोरे, माहीती उपलब्ध नसतांना महात्मा फुले चौक पोलीस ठाण्याचे तपास पथकाचे अधिकारी व अंमलदार यांनी वरिष्ठांनी दिलेल्या सुचना व मार्गदर्शनाखाली तपास करून घटनेच्या आजुबाजुचे परिसरातील सी.सी.टी.व्ही. फुटेजची सतत पाहणी करून अखेर आरोपी हे एका काळया लाल रंगाच्या स्कुटीवर आल्याचे निष्पन्न केले. त्यानंतर तपासात सातत्य राखुन आरोपी यांचे येण्या जाण्याचे मार्गाचे फुटेजची पाहणी करून आरोपी हे नालासोपारा परिसरात गेले असल्याचे दिसुन आले. त्यानंतर वेळोवेळी वरिष्ठांचे परवानगीने नालासोपारा परिसरात जावुन तपास केला असता सदर गुन्हा हा साजीद शेख व त्याचा साथीदार सावेज यांनी केला असल्याचे निष्पन्न झाले.

त्यानंतर तपासादम्यान आरोपी साजीद अकबर शेख वय.३४ वर्षे यास दिनांक ०८/०८/२०२५ रोजी तपासकामी अटक केली. त्यानंतर तपासादरम्यान नमुद गुन्हयामधील मुद्देमालाची विल्हेवाट लावणारा ऋषीकेश चौधरी व महीला नामे प्रिती कदम यांना अटक करण्यात आली आहे. नमुद गुन्हयातील पाहीजे आरोपी नामे. सावेज शेख याचा शोध सुरू असुन तपास चालु आहे. तसेच तपासादरम्यान महात्मा फुले चौक पोलीस ठाणे गु.रजि.नं. ४१२/२०२५ भारतीय न्याय संहीता २०२३ चे कलम ३३१(३), ३०५(ए) अन्वये दाखल गुन्हा उघडकीस आणलेला आहे. गुन्हयाचे तपासदरम्यान चोरीस गेले मुद्देमालापैकी हस्तगत करण्यात करण्यात आलेल्या मुद्देमालाचे वर्णन खालील प्रमाणे

- महात्मा फुले चौक पो.स्टे.,गु.रजि.नं.४१५/२०२५ बी.एन.एस. २०२३ चे कलम ३३१(३),३०५(ए), ३१७(४),३१७(५) मधील हस्तगत मुद्देमाल खालील प्रमाणे.

१	६,५०,०००/—	रू.एक सोन्याची लगड एकुण १००.०१० ग्रॅम वजनाची कि. अंदाजे
२	८०,०००/—	रू.अंदाजे १ किलो वजनाची चांदी त्यामध्ये एकुन ११ लहान मोठे आकाराचे चांदीचे कॉईन व चांदीची लहान वीट कि.अंदाजे
	७,३०,०००:—	रू एकुण किंमतीचा मुद्देमाल

कृपया मागे पहावे....

❖ महात्मा फुले चौक पोलीस ठाणे गु.रजि.नं.४१२/२०२५ बी.एन.एस. २०२३ कलम ३३१(३), ३०५(ए), मधील हस्तगत मुद्देमाल खालील प्रमाणे.

३	६०,०००/—	एक सोन्याची लगड एकुण ८.०६० ग्रॅम वजनाची कि. अंदाजे

सदरची कामगिरी मा.श्री आशुतोष डुंबरे साो,पोलीस आयुक्त ठाणे शहर, मा.श्री ज्ञानेश्वर चव्हाण सो, सह पोलीस आयुक्त ठाणे शहर, मा.श्री संजय जाधव सोा.अपर पोलीस आयुक्त,पुर्व प्रादेशिक विभाग कल्याण, मा.श्री अतुल झेंडे सोा, पोलीस उप आयुक्त परिमंडळ—३, कल्याण, मा. श्री. कल्याणजी घेटे सों, सहाय्यक पोलीस आयुक्त कल्याण विभाग यांचे मार्गदर्शनाखाली महात्मा फुले चौक पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.बळीरामसिंग परदेशी, पोनि/विजय नाईक व तपास पथकातील अधिकारी सपोनि/स्वप्नील भुजबळ, व पो.हवा./२७६८ साळुंखे, पो.हवा./६२९८ तडवी, पो.कॉ./४१९१ वडगावे, पो.कॉ./९९९ कोळी, पो.कॉ./८०१० जाधव यांनी केली आहे. नमुद गुन्हयाचा पुढील तपास सपोनि/ स्वप्नील भुजबळ हे करीत आहेत.